शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

||| विद्याधनं सर्वधन् प्रधानम् |||

दि. महाराष्ट्र एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस् अकॅडमी चंदगड

# महादेवराव बी.एड्. कॉलेज, तुर्केवाडी

# ता. चंदगड, जि. कोल्हापूर

## सन 2024 -2025

# Best Practices

# औषधी वनस्पतींची लागवड
# आणि
# त्याबाबत जनजागृती उपक्रम

# उपक्रमाचे नाव

# औषधी वनस्पतींची लागवड
# आणि
# त्याबाबत जनजागृती उपक्रम

मानवाच्या अस्तित्व सध्या पर्यावरणा वर अवलंबून आहे पण सध्या स्थिती पर्यावरण संरक्षण व संवर्धन या बाबीकडे पुरेशा प्रमाणात प्रयत्न होत नाही तसेच मानवाने आपल्या गरजा व मर्यादित केल्याने ते पूर्ण करण्यासाठी निसर्गाची हानी केली आहे साहजिकच पर्यावरणाचा समतोल ढासल्यामुळे अनेक पर्यावरण समस्या उद्भवत लागल्या आहेत या सर्व गोष्टींचा विचार करून पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षणासाठी समाजाच्या सर्व स्तरातून सकारात्मक्क कृतीयुक्त प्रयत्नाची गरज भासत आहे त्यामुळे बी. एड. प्रशिक्षणार्थी मध्ये पर्यावरण विषय जनजागृती करण्यासाठी व पर्यावरण संवर्धनातील आपली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी औषधी वनस्पती लागवड व जनजागृती उपक्रम आमच्या महादेव बी. एड. कॉलेज, तुर्केवाडी येथे राबवण्यात आला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्टे :**

- बी. एड. शिक्षणार्थी मध्ये पर्यावरण संरक्षण संवर्धन विषयक जनजागृती निर्माण करणे
- बी. एड. प्रशिक्षणार्थीमध्ये औषधी वनस्पती व व त्यांची लागवड व त्यांचा उपचार कशा पद्धतीने घेतला जातो याची माहिती जाणून घेणे
- चंदगड तालुक्यामध्ये आढळणाऱ्या औषधी वनस्पतींची माहिती घेणे.
- बी. एड. प्रशिक्षणार्थीमध्ये निसर्गा विषयी अभिरुची व सहानुभूती निर्माण करणे.

- **कार्यक्रमाची कार्यवाही:**

या कालावधीमध्ये महादेवराव बी एड कॉलेज तुर्केवाडी येथे औषधी वनस्पती लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष माननीय श्री. महादेवराव वांद्रे साहेब संस्थापक, तसेच आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एन. जे कांबळे, तसेच आमच्या महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्राध्यापक श्री . ग. गो प्रधान, तसेच

आमच्या महाविद्यालयाचे प्राध्यापक प्राध्यापक श्री. एम. आर. मुल्ला , वाय. पी. पाटील उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशिक्षणार्थी श्रद्धा मटकर हिने केले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्था अध्यक्ष माननीय श्री महादेव वांद्रे साहेब यांनी पर्यावरण संवर्धन आणि औषधी वनस्पतींचे उपयोग आशा उपक्रमाचे आवश्यकता असून औषधी वनस्पती ही मोहीम हाती घ्यावी व वृक्ष लागवड बरोबरच त्यांच्या वाढीसाठी ही काळजी घेणे ही जबाबदारी आपली आहे असे प्रतिपादन यावेळी केले.

या कार्यक्रमासाठी जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रा. मगदूम बी. एस. यांचे हस्ते वृक्षारोपण केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षमित्र बनणे काळाची गरज आहे. औषधी वनस्पती आपल्या दैनंदिन जीवनात खूप उपयुक्त असतात पण त्यांची माहिती खूप कमी लोकाना असते. यासाठी सदर वनस्पतींची शास्त्रीय उपयुक्तता स्थानिक लोकंपर्यंत पोहचवण्याचे काम बी. एड. प्रशिक्षणार्थिनी करावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

कॉलेजचे प्रभारी प्राचार्य श्री. एन. जे. कांबळे यांनी औषधी वनस्पती लागवड केलेल्या सर्व प्रशिक्षणार्थीना शुभेच्छा दिल्या व समाजभिमुख व पर्यावरणापूरक कार्यक्रमाला प्राधान्य देऊन जनजागृती करण्याचे आव्हान यावेळी केले.

विभाग प्रमुख प्राध्यापक श्री ग. गो प्रधान यांनी औषधी वनस्पती हे कार्य महाविद्यालया पुरते मर्यादित न ठेवता त्याची व्याप्ती वाढवून समाजाचा सहभाग घेण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे काम करावे तसेच शाश्वत विकास साठी औषधी वनस्पती वृक्ष संवर्धनाची भूमिका स्पष्ट केली.

मार्गदर्शक प्रा. श्री. एम. आर. मुल्ला यांनी औषधी वनस्पती उपक्रमाविषयी सर्वांना माहिती दिली व हा उपक्रम किती महत्त्वाचा आहे हे सर्वांनी सांगितले त्यांनी या गटाला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे हस्ते आणि बी. एड. प्रशिक्षणार्थी यांनी महाविद्यालयाच्या परिसरात औषधी वनस्पतींची लागवड केली. यामध्ये मॉस्क्युटोरणार, इन्सुलिन, हाड जोड, निलगिरी, पुदिना, पानफुटी, पारिजातक, मिरी, लवंग, जायफळ, वेलची, लिंबू, दालचिनी, आवळा, अशा अनेक वनस्पतींची लागवड केली. त्याचबरोबर प्रशिक्षणार्थी किरण नाईक आणि त्यांच्या गटाने फुलझाडांची लागवड केली. शेवटी प्रशिक्षणार्थी पुनम कार्वेकर यांनी उपस्थित सर्वांच्या आभार मानले व हा कार्यक्रम येथेच संपन्न झाला असे घोषित केले.

# औषधी वनस्पतींची लागवड आणि त्याबाबत जनजागृती उपक्रम क्षणचित्रे











